वाचा :-१. मुंबई होमगार्ड अधिनियम,१९४७ चे कलम ८च्या खंड (ई) आणि त्याबाबत शासन गृहविभाग (विशेष) यांचेकडील सहपत्र दिनांक १८/०२/२००६.
२. इकडील आदेश क्रमाक पसह/कावि/१९८७/२०१० दिनांक १४/१२/२०१०
३. इकडील सुधारीत आदेश क्रमाक पसह/कावि/२२८३/२०११ दिनांक १५/१२/२०११
४. मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./१७१७ दिनांक- ६/१०/२०१५.

---

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
सर्वसाधारण शाखा,
क्रं.सशा/पसह/कावि/२१२७/२०१५
पुणे १ दिनांक /१०/२०१५.
१६/११/२०१५

**विषय :- जिल्हा होमगार्ड सल्लागार समिती.**

**सुधारित आदेश**

मुंबई होमगार्ड अधिनियम १९४७ मधील कलम ८अन्वये व शासन गृहविभाग (विशेष) यांचेकडील सहपत्र दिनांक १८/०२/२००६ नुसार जिल्हास्तरावर जिल्हा होमगार्ड सल्लागार समिती खालीलप्रमाणे समिती गठीत करणेत येत आहे.

| अ.क्र | समितीची रचना व नांवे | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १) | मा. जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय पुणे | अध्यक्ष |
| २) | पोलीस आयुक्त, पुणे | पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे | सदस्य |
| ३) | पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामिण | जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, चव्हाणनगर, पाषाण, पुणे | सदस्य |
| ४) | जिल्हा परिषद, अध्यक्ष | जिल्हा परिषद, कॅम्प पुणे | सदस्य |
| ५) | अशासकिय सदस्य | | |
| | १) श्री. अंकुश नारायण पानसरे, | मु. पो.कन्रि (तांबे) जुन्नर, जि. पुणे | सदस्य |
| | २) श्री. जितेंद्र चंद्रकांत राऊत | क्षितिज कॉलनी, पिंपळे निलख, औंध, कॅम्प पुणे २७. | सदस्य |
| | ३) श्री. अजय रामचंद्र मोहोळ, | फ्लॅट नं.१५, शिवामृत अपार्ट. भुसारी कॉलनी समोर, पौड रोड, कोथरुड, पुणे मो.नं.८५५४९९०३७६ | सदस्य |
| | ४) श्री. विरेन हनुमंत साठे, | स.नं. ११, राजीव गांधी वसाहत, चव्हाणनगर, पुणे | सदस्य |
| | ५) श्री. विकास अण्णासाहेब एकशिंगे, | स.नं.६४/२/११, आदिनाथ कॉलनी, शनिनगर, रहाटणी, पुणे मो.नं. ९८२२५५७९९२ | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | कमांडट होमगार्ड | जिल्हा समादेशक,होमगार्ड कार्यालय, स.नं.९०/२ आळंदी रोड, होमगार्ड चोक, लाईन बाजार साप्रस येरवडा, पुणे ४११००६ | सदस्य- सचिव |

**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी पुणे**

प्रत :- १) कमांडट, होमगार्ड, जिल्हा समादेशक, होमगार्ड कार्यालय, तथा, सदस्य सचिव स.नं.९०/२ आळंदी रोड, होमगार्ड चौक, लाईन बाजार साप्रस येरवडा, पुणे ४११ ००६.

२/- उपरोक्त समिती वरील आदेशान्वये गठित करण्यात आलेली असल्याने सदर समितीची बैठक सत्वर बोलावून समितीचे कामकाज कार्यान्वित करण्यात यावे. तसेच सोबतच्या आदेशाच्या प्रती संबंधित सदस्यांना बजावून त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेणेत यावी

२) स्वीय सहाय्यक, मा. पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.

२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केलीबाबत मा. मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

३) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडेस सविनय सादर.

सही/-xx
जिल्हाधिकारी पुणे करिता

असा. क्र. ३१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

शनिवार, फेब्रुवारी १८, २००६/माघ २९, शके १९२७

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

### गृह विभाग (विशेष)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ फेब्रुवारी २००६.

### अधिसूचना

**मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७.**

क्रमांक एचजीएस. २००५ / ११९९ / प्र. क्र. ७४/वि.शा. ८.––मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७ (१९४७ चे मुंबई तीन) च्या कलम ८ च्या खंड (इ) आणि त्याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे मुंबई होमगार्ड नियम, १९५३ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. ते असे :–––

१. या नियमांना मुंबई होमगार्ड (दुसरी सुधारणा) नियम, २००६ असे संबोधण्यात यावे.



[ किंमत : रुपये ३.०० ]

२. मुंबई होमगार्ड नियम, १९५३ च्या नियम ५ ऐवजी खालील नियम वाचण्यात यावा तो असा :—

"५. होमगार्ड सल्लागार समिती.—(१) राज्य शासन पुढील समित्या गठीत करू शकेल,—

(अ) संपूर्ण राज्यासाठी मध्यवर्ती सल्लागार समिती ;

(ब) बृहन्मुंबईकरिता सल्लागार समिती ; आणि

(क) अन्य ठिकाणी प्रत्येक जिल्ह्याकरिता जिल्हा सल्लागार समिती.

(२) मध्यवर्ती सल्लागार-समितीमध्ये १२ शासकीय सदस्य आणि शासनाने नामनिर्देशित केलेल्या ४ पेक्षा अधिक नसतील एवढे अशासकीय सदस्यांचा समावेश असेल. समितीचे शासकीय सदस्य पुढीलप्रमाणे असतील, ते असे :—

| | | |
|---|---|---|
| १ | गृह मंत्री | अध्यक्ष |
| २ | राज्यमंत्री (गृह) | सहअध्यक्ष |
| ३ | शासनाचे मुख्य सचिव | सदस्य |
| ४ | शासनाचे अपर मुख्य सचिव, गृह विभाग | सदस्य |
| ५ | महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ६ | शासनाचे सचिव/प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन विभाग | सदस्य |
| ७ | शासनाचे सचिव/प्रधान सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ८ | महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ९ | मुख्य अग्निशमन सल्लागार, बृहन्मुंबई | सदस्य |
| १० | महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य यांनी नामनिर्देशित केलेला सदस्य | सदस्य |
| ११ | संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी नामनिर्देशित केलेला मुख्य क्षेत्ररक्षक. | सदस्य |
| १२ | महासमादेशक, होमगार्ड व संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य | सदस्य सचिव. |

(३) बृहन्मुंबईकरिता असलेल्या सल्लागार समितीमध्ये ७ शासकीय सदस्य आणि पालकमंत्र्यांच्या सहमतीने समितीच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेल्या ६ पेक्षा अधिक नसतील एवढ्या अशासकीय सदस्यांचा समावेश असेल. समितीचे शासकीय सदस्य पुढीलप्रमाणे असतील, ते असे :—

| | | |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त, कोकण विभाग | अध्यक्ष |
| २ | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | सदस्य |
| ३ | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ४ | मुख्य अग्निशमन अधिकारी, बृहन्मुंबई | सदस्य |
| ५ | अतिरिक्त नियंत्रक, नागरी संरक्षण, बृहन्मुंबई | सदस्य |
| ६ | मुख्य क्षेत्ररक्षक, नागरी संरक्षण, बृहन्मुंबई | सदस्य |
| ७ | महासमादेशक, होमगार्ड व संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य | सदस्य सचिव. |



(४) प्रत्येक जिल्ह्याकरिता असलेल्या जिल्हा सल्लागार समितीमध्ये ५ शासकीय सदस्य आणि पालकमंत्र्यांच्या सहमतीने समितीच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेल्या ५ पेक्षा अधिक नसतील एवढ्या अशासकीय सदस्यांचा समावेश असेल. समितीचे शासकीय सदस्य पुढीलप्रमाणे असतील, ते असे :—

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | पोलीस आयुक्तालय असल्यास, पोलीस आयुक्त किंवा पोलीस उपायुक्तापेक्षा कमी दर्जाचा नसलेला त्यांचा प्रतिनिधी. | सदस्य |
| ३ | पोलीस अधीक्षक | सदस्य |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५ | जिल्हा समादेशक, होमगार्ड | सदस्य-सचिव. |

(५) वरील कोणत्याही सल्लागार समितीच्या अशासकीय सदस्यांचा कार्यकाळ त्यांच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून साधारण ३ वर्षांचा असेल आणि सदरचा कार्यकाल संपल्यानंतर असा सदस्य पुन्हा नामनिर्देशनासाठी पात्र राहील.

(६) (अ) मध्यवर्ती सल्लागार समिती आवश्यक तेवढ्या वेळा बैठका घेऊ शकेल, मात्र, वर्षातून किमान एकदा तरी बैठक घेईल.

(ब) इतर सल्लागार समित्या आवश्यक तेवढ्या वेळा बैठका घेऊ शकतील, मात्र तीन महिन्यातून किमान एकदा तरी बैठक घेतील.

(क) होमगार्ड संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेऊन संघटना कार्यक्षमरित्या काम करण्याच्या दृष्टीने समित्या उपाययोजना सूचवतील. समितीचे कार्य हे केवळ सल्लागार स्वरूपाचे असेल, आणि ते फक्त संघटनेच्या सर्वसाधारण हिताच्या बाबी विचारात घेतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**क. गो. देशपांडे,**
शासनाचे उप सचिव.

असा. क्र. ३१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शनिवार, फेब्रुवारी १८, २००६/ माघ २९, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

### गृह विभाग (विशेष)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ फेब्रुवारी २००६.

**अधिसूचना**

**मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७.**

क्रमांक एचजीएस. २००५ / ११९९ / प्र. क्र. ७४/वि.शा. ८.—मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७ (१९४७ चे मुंबई तीन) च्या कलम ८ च्या खंड (इ) आणि त्याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे मुंबई होमगार्ड नियम, १९५३ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. ते असे :—

१. या नियमांना मुंबई होमगार्ड (दुसरी सुधारणा) नियम, २००६ असे संबोधण्यात यावे.